प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
www.pudhari.

# विश्वकर्मा-केंब्रिजमध्ये गुणवत्ता वाढीसाठी करार

पुणे : पुढारी वृत्तसेवा

विश्वकर्मा विद्यापीठ आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड अससेसमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींसाठी प्री-सर्व्हिस शिक्षक प्रशिक्षण हा चार महिन्यांचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. याचा शिक्षकांच्या गुणवत्तावाढीसाठी फायदा होणार आहे. यासाठी दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार केला.

केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस एन्ड असससेसमेंटद्वारे हा अभ्यासक्रम विकसित केलेला आहे. हा अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्री-सर्व्हिस शिक्षक आणि नव्याने शिक्षण शास्त्रातील पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी तयार केला आहे. या अभ्यासक्रमाचा उद्देश शिक्षकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त अध्यापन पद्धती, नाविन्यपूर्ण शिक्षण तंत्रे आणि वर्गखोल्यांमध्ये प्रभावीपणे अध्यापनासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करणे हा आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल म्हणाले, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस एन्ड असेसमेंट बरोबरच्या या सहकार्यामुळे शिक्षक होण्याचे स्वप्न बाळगलेल्या तरुण- तरुणींना अध्यापन आणि शिक्षणातील सर्वोत्तम पद्धती शिकण्याची संधी मिळेल. अशा उपक्रमांमुळे शिक्षकांचा व्यावसायिक विकास होण्यास मदत होते आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या गुणवत्ता सुधारणेस हातभार लागतो.

केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस असससेसमेंट, दक्षिण आशियाचे व्यवस्थापकीय संचालक अरुण राजमणी म्हणाले, केंब्रिज विद्यापीठ म्हणून आम्हाला असे वाटते की शिक्षणाच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षकांना सक्षम करणे अत्यावश्यक आहे. शिक्षकांच्या विकासामध्ये गुंतवणूक केल्यास शिक्षणाच्या दर्जामध्ये सकारात्मक बदल घडू शकतो. संबंधित प्री-सर्व्हिस शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम शिक्षकांना संशोधनाधारित शिक्षण, विचारक्षमता, सामाजिक-भावनिक शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून वैयक्तिकृत शिक्षण देण्यासाठी तयार करणार आहे. केंब्रिज सातत्याने व्यावसायिक विकास कार्यक्रम राबवत असून, हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. हा नवीन उपक्रम शिक्षक क्षमतावृद्धीच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

My Pune Edition
Feb 19, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com